MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १७ अंक : ४ पाने : ८ जून-जुलै २०२२ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आपण आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत प्रवेश करत असून या तिमाहीत माझे कर्मचारी व अधिकारी चांगली कामगिरी करतील, असा मला विश्वास आहे. आपल्या कामाचे `लक्ष्य` (Targets) पूर्ण करणे, ही आपली जबाबदारी आहे, असे प्रत्येकाला वाटणे गरजेचे आहे. आपण भाग्यवान आहोत की, आपण अशा क्षेत्रात आहोत ज्याची गरज सतत वाढतच जाणार आहे. विजेची ही वाढती मागणी म्हणजे आपल्याला दररोज चांगले काम करण्याची संधी आहे. महापारेषण

- ▶ टीमवर्कने कामांमध्ये सुधारणा करा
- ▶ `लक्ष्य` (Targets) पूर्ण करा
- ▶ पावसाळ्यात संचलन करताना दक्षता घ्या
- ▶ जीवित व वित्तीय हानी होता कामा नये

कंपनीची यंत्रणा आपण किती सुसज्ज ठेवतो आणि विजेचा अविरत पुरवठा कसा करतो, यावर आपली प्रगती अवलंबून आहे. यासाठी महानिर्मिती व महावितरण कंपन्यांशीही सतत समन्वय ठेवण्याची गरज आहे.

सध्या पावसाळा सुरु आहे. पावसाळ्यात संचलन करताना अनेक प्रश्न तयार होतात. त्यासाठी अधिक दक्षतेने यंत्रणा सुसज्ज ठेवली पाहिजे. या काळात काही समस्या उदभवणार नाहीत, याची काळजी प्रत्येक युनिटने घेतली पाहिजे. पावसाळ्यात प्रकल्पाची कामे मंदावत असली तरी इतर पाठपुराव्याची (Follow-up) कामे मोठ्या जोमाने व गतीने आपण करू शकतो. ती आता केली गेली तर वर्षभर आपण अधिक चांगली सेवा देऊ शकतो. त्यामुळे पाठपुराव्याच्या कामालाही तेवढेच महत्त्व आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

आपण जी सेवा देतो किंवा जी कार्यप्रणाली वापरतो, ती अनेकदा आपल्या वर्षानुवर्षे अंगवळणी पडलेली असते. पण, त्या कार्यप्रणालीत सतत सुधारणा करून ती सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक अभियंता व अधिकाऱ्यांची आहे. त्यादृष्टीने आपण किती विचार करतो, याचा प्रत्येकाने आढावा घ्यावा आणि कार्यप्रणालीत कोणत्या सुधारणा करता येतील, याविषयी पुढाकार घ्यावा. अशा पुढाकाराचे कंपनी नक्कीच स्वागत करेल, ही खात्री आपण सर्वांनी बाळगावी.

देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या या कंपनीत काम करताना आणखी काही मुलभूत गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. त्यातील पहिली म्हणजे आपली दररोजची कामे नियमित आणि वेळेत होतात का? ते करताना जीवित व वित्तीय हानी होता कामा नये. यासाठी आपण विशेष आणि सतत प्रयत्नशील आहोत ना? आपण आपल्या कंपनीच्या एका मोठ्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहोत. आपण करत असलेल्या कामांमुळेच कामांची एक दीर्घ साखळी पूर्ण होत असते, हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे.

आता तिमाहीत कामाचे नियोजन करणे. त्यात सुधारणा करणे आणि झालेल्या कामाचे मूल्यमापन करणे, अशी सवय आपण आपल्याला लावून घेतली पाहिजे. आधुनिक जगात Quality आणि Quantity अशा दोन्ही गोष्टींचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे आपले कार्य गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या चांगले असणे गरजेचे आहे. खरं म्हणजे त्याशिवाय आता पर्यायच राहिलेला नाही. आधुनिक जगातील हा सकारात्मक बदल आपण जितका लवकर आणि जितका चांगला समजून घेऊ तितका आपल्या कामातील आपला सहभाग वाढेल. असा उत्स्फूर्त सहभाग या तिमाहीतही आपण द्याल, याची मला खात्री आहे.



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत्येक कर्मचाऱ्याने योग्य नियोजन, समन्वय व टीमवर्क ठेवून प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. मागील अनुभवातून प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी व अडथळे दूर करून नवीन प्रकल्प पूर्ण करण्याचा सचोटीने प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक कर्मचाऱ्याने कंपनीच्या `लक्ष्यां`सह (Targets) आवश्यक कार्य केले पाहिजे.

चांगला संघप्रमुख नेहमीच एक ध्येय घेऊन संघाचे नेतृत्व करतो. मी आशा करतो की, कंपनीचा प्रत्येक अधिकारी त्यांच्या टीमचे नेतृत्व करताना निश्चितपणे गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करेल. अशक्य वाटणारं काम करण्याचं सामर्थ्य टीमवर्कमध्ये असते. मला खात्री आहे की, प्रत्येक कर्मचारी भविष्यात यशाच्या मार्गाकडे जाण्यासाठी चांगले गुण आत्मसात करण्याचा नक्कीच प्रयत्न करेल.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**मुंबई :** महापारेषणच्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभाचे उद्‌घाटन करताना प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. याप्रसंगी डावीकडून संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे. संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड.

**आनंदसोहळा**

## महापारेषणचा १७ वा वर्धापनदिन

# स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा

Follow us on :

''सध्याच्या स्पर्धेत टिकायचे असेल तर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करूनच आपला स्पर्धेमध्ये टिकाव लागू शकतो'', असे प्रतिपादन ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या १७ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात श्री. वाघमारे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. सुरूवातीला प्रास्ताविकात महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले, ''कंपनीची संस्कृती व कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येणे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण करणे, मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून कंपनीचा विकास साधावा, या हेतूने महापारेषणतर्फे कंपनीचा १७ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा त्यामागचा हेतू आहे''

श्री. दिनेश वाघमारे म्हणाले, ''आपली कंपनी जोपर्यंत कात टाकत नाही, तोपर्यंत या खासगी कंपन्यांसमोर आपला टिकाव लागणार नाही. महापारेषणने ड्रोनच्या साहाय्याने काम करण्यास सुरुवात केली आहे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नव्या संकल्पनेचा अवलंब केला पाहिजे. नव्या तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे.'' ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना








## उत्साहात साजरा

# वापर करा : दिनेश वाघमारे

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन, मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. योगेश पाचपांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडळातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.











**मुंबई :** 'उज्ज्वल भारत, उज्ज्वल भविष्य' पॉवर@2047 या कार्यक्रमाचा दीपप्रज्वलनाने शुभारंभ करताना प्रधान सचिव (ऊर्जा) संचालक श्री. दिनेश वाघमारे, सोबत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल.

### ▶ 'उज्ज्वल भारत, उज्ज्वल भविष्य' पॉवर@2047 कार्यक्रम उत्साहात

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्पर्धेत टिकून राहणे शक्य : श्री. दिनेश वाघमारे

Follow us on :

''जगभरात वीजक्षेत्रात आमुलाग्र बदल घडत आहे. या बदलांना सामोरे जात शासकीय वीज कंपन्यांना स्पर्धेत टिकून राहायचे असल्यास अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल. महापारेषणमध्ये आता ड्रोनच्या सहाय्याने वीज वाहिन्यांची तपासणी केली जाते. महावितरणदेखील स्मार्ट मीटर आणि आधुनिक जीआयएस माध्यमातून बदल घडवून आणत आहे तर महानिर्मितीचे सर्व संच मेरिट ऑर्डर डिस्पॅचमध्ये आले असून या संचांनी विक्रमी वीजनिर्मिती केली आहे. अशा अनेक बदलांमुळे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राला नवी उभारी मिळणार आहे'', असे प्रतिपादन राज्याचे प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी केले.

भारत सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभागांतर्गत 'उज्ज्वल भारत, उज्ज्वल भविष्य' पॉवर@2047 या अभिनव संकल्पनेअंतर्गत महावितरणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे या ऊर्जा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल होते. या



**मुंबई :** कार्यक्रमाला उपस्थित असलेले अधिकारी-कर्मचारी वर्ग.

ऊर्जा महोत्सवाच्या कार्यक्रमात विविध योजनेतील लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यातील तिन्हीही कंपन्या एकमेकांशी निगडीत असून या कंपन्यांनी एकत्रित काम करण्याची गरज असल्याचे श्री. दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

मागील वर्षभरात महावितरणने वीजहानीचे प्रमाण २१ टक्क्यांवरून १५ टक्के आणले असून फोटो मीटर रिडींगमधील चुका टाळण्यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महिन्याला सुमारे २०० ते २५० कोटींनी वीज बिलींग वाढले आहे. महावितरणच्या कर्मचा-यांमध्ये अतिशय चांगले काम करण्याची क्षमता असून ती ओळखून त्या पध्दतीने काम करण्याचे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी केले. यावेळी महावितरणने केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या राबविलेल्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी महावितरणमधील मृत व वैद्यकीयदृष्ट्या अपात्र कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना त्यांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा प्रस्ताव संबंधित कार्यालयांकडे सादर केल्यानंतर त्याला या प्रस्तावाची सद्यस्थिती कळावी. तसेच प्रस्ताव मंजूर होण्यामध्ये पारदर्शकता राहावी या उद्देशाने माहिती तंत्रज्ञान व मानव संसाधन विभागाने तयार केलेल्या अनुकंपा नियुक्ती पोर्टलचा शुभारंभ श्री. दिनेश वाघमारे आणि श्री. विजय सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला. या पोर्टलमुळे महावितरणच्या मुख्यालयात एका क्लिकवर प्रलंबित प्रकरणांची अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे तसेच अवलंबितांना देखील त्यांच्या प्रकरणाची अद्ययावत स्थिती बघणे शक्य होईल.

याप्रसंगी महावितरणचे संचालक (वाणिज्य) डॉ. मुरहरी केळे, महानिर्मितीचे संचालक (संचालन) श्री. चंद्रकांत थोटवे, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्यासह अन्य तिन्ही कंपन्यांचे संचालक उपस्थित होते. यावेळी केंद्र सरकारच्या ऊर्जाविषयक विविध योजना व महावितरणने राबविलेल्या योजनांवरील माहितीपट आणि पथनाट्ये सादर करण्यात आली. कार्यक्रमाला तिन्हीही वीज कंपन्यांचे संचालक, वरिष्ठ अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक (मानव संसाधन) डॉ. नरेश गिते यांनी तर आभार प्रदर्शन कार्यकारी संचालक (वितरण) श्री. अरविंद भादीकर यांनी केले.



**औरंगाबाद :** परिमंडळांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष बैठक हॉटेल द. फर्न, औरंगाबाद येथे संपन्न झाली. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) (प्रभारी) श्री. योगेश पाचपांडे, मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. मिलिंद बनसोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी वर्ग.

### ▶ संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी केले मार्गदर्शन

# औरंगाबाद परिमंडळांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष बैठक

Follow us on :

औरंगाबाद परिमंडळांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष बैठक हॉटेल द. फर्न, औरंगाबाद येथे संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. मिलिंद बनसोडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) (प्रभारी) श्री. योगेश पाचपांडे उपस्थित होते.

यावेळी औरंगाबाद परिमंडळांतर्गत कार्यरत असणारे अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, अधीक्षक अभियंता श्री. संजय परदेशी, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संजीव कांबळे, अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. रंगनाथ शेळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. बलराज पारिपेल्ली, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. प्रवीण यशवंते, श्री. विवेक कानडे, श्रीमती अंजना ठक्कर, श्रीमती मनिषा भंगाळे यांच्यासह ६० अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. मिलिंद बनसोडे यांनी इतिहासकालीन टाऊन हॉल बैठकीच्या संकल्पनेचे विवेचन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी मोलाचे मार्गदर्शन करून उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. उपकेंद्रे व वाहिन्यांची देखभाल व दुरूस्ती उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळाचा सुयोग्य वापर करून महापारेषणने दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याचे आवाहन केले. अभियंत्यांच्या भरती, पदोन्नती, उच्चवेतन श्रेणी लाभ इत्यादींच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) सौ. मंजुषा दुसाने यांनी केले. कार्यकारी अभियंता श्री. विवेक कानडे यांनी आभार मानले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती माहे जून-जुलै २०२२

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती. शिल्पा कुंभार | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, कराड | ०२.०६.२०२२ |
| २ | श्री. सुनील सूर्यवंशी | मुख्य अभियंता (पारेषण) | कंत्राटे आणि अनुश्रावके विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | ०२.०६.२०२२ |
| ३ | श्री. सतीश आणे | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर | ०२.०६.२०२२ |
| ४ | श्री. रंगनाथ शेळके | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सुरक्षा, स्वयंचलन नि दूरसंचारण मंडळ, औरंगाबाद | २७.०६.२०२२ |
| ५ | श्रीमती. वर्षा मानकर | अधीक्षक अभियंता (पारेषण) | कंत्राटे आणि अनुश्रावके विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | २७.७.२०२२ |



**कराड :** परिमंडळात महापारेषणच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांच्यासह पारितोषिक विजेते अधिकारी-कर्मचारी.

# कराड परिमंडळात वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

Follow us on :

कराड परिमंडळात महापारेषणचा १७ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते.

वर्धापनदिनाच्या निमित्ताने क्षेत्रीय स्तरावरील विजेत्या उपकेंद्र व वाहिनी उपविभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांनी गायन, नृत्य, वादन अशा विविध कला सादर करून कार्यक्रमाला रंगत आणली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. पद्माकर जोशी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. माधुरी शेठ, उपकार्यकारी अभियंता श्री. प्रवीण पुजारी यांनी केले. प्रास्ताविक व आभार सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) श्री. राजू कोळी यांनी केले.

# अमरावतीमध्ये कंपनीचा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

Follow us on :

अमरावती परिमंडळात महापारेषण कंपनीचा १७ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात साजरा झाला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सन २०२१-२०२२ या वर्षासाठी अमरावती परिमंडळास राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक २२० के. व्ही. उपकेंद्र, चिखली, १३२ के. व्ही. उपकेंद्र, मालेगाव तसेच व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक लाईन प्रकल्प उपविभाग, यवतमाळ, ४०० के. व्ही. उपकेंद्र, अकोला यांनी प्राप्त केले.

परिमंडळ स्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक वाहिनी प्रकल्प उपविभाग, यवतमाळ, उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, अकोला, अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, पुसद, अउदा वाहिनी देखभाल उपविभाग अकोला तसेच व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक २२० के. व्ही. उपकेंद्र, अंजनगाव, १३२ के. व्ही. उपकेंद्र, तिवसा, अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, अमरावती, उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, खामगाव यांनी प्राप्त केले.

या कार्यक्रमास मुख्य अभियंता सर्वश्री जयंत विके, अधीक्षक अभियंता सुनील शेरेकर, गोविंद जाधव, प्रमोद पखाले, सुधीर ढवळे, मुकेश तट्टे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) चंद्रशेखर बोराडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) सचिन सावरकर यांच्यासह कार्यकारी अभियंते, अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.




**अमरावती :** महापारेषण कंपनीच्या वर्धापनदिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना कलाकार.

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco





# प्रकल्प दृष्टिकोन

सर्वप्रथम, मी प्रकल्प, सं.व.सु. वित्त आणि मानव संसाधन विभागातील सर्व संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो, ज्यांनी ४०० के. व्ही. कर्जत उपकेंद्रासहित एकूण १२ अ.उ.दा. उपकेंद्रांची कामे पूर्ण करून यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यासाठी सांघिकरित्या काम केले. परिणामस्तव आर्थिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये १६२७ एम.व्ही.ए. क्षमतावाढ करण्यात आपल्याला यश आले आहे. तसेच १८ आय.सी.टी. व ११ रोहित्रांव्दारे अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रांमध्ये क्षमतावाढीच्या माध्यमातून १३११ एम.व्ही.ए.ची वाढ करू शकलो. त्याचबरोबर या काळात ४०० के. व्ही. च्या ५ उपकेंद्रामध्ये ६२५ एम.व्ही.ए.आर रिऍक्टरची सुध्दा उभारणी करण्यात यश प्राप्त झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महापारेषण कंपनीने एकूण ५४६.६३ सर्किट कि.मी. अ.उ.दा. वाहिन्यांची उभारणी व ९८.१७ सर्किट कि. मी. ची दुसरे परिपथ ओढण्याची (2nd Ckt Stringing) कामे सुध्दा यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत.

आपल्याला माहितच आहे की, प्रकल्प केवळ कार्यान्वित करणे फक्त हेच आपले लक्ष्य नसून मा. वीज नियामक आयोगाची मंजुरी प्राप्त करण्यासाठी कार्यान्वित केलेल्या मालमत्तेचे भांडवलीकरण होणे हे देखील तितकेच गरजेचे असते. आपण सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण रू. १२६३ कोटींचे भांडवलीकरण साध्य करू शकलो. परिमंडळनिहाय भांडवलीकरण अमरावती-३८ कोटी, औरंगाबाद-१४८ कोटी, कराड-९० कोटी, नागपूर-११७ कोटी, नाशिक-५०० कोटी, पुणे-२६७ कोटी व वाशी-१०३ कोटी याप्रमाणे आहे.

महत्त्वाचे म्हणजे, भांडवलीकरणाच्या प्रयत्नांना संबंधित प्रकल्प आणि सं व सु विभाग/मंडळ स्तरावर समन्वय असणे आवश्यक आहे. या बाबतीत १२६३ कोटींचा टप्पा गाठण्यासाठी कंपनीतील सर्व अधिकारी व कर्मचारी विशेष कौतुकास पात्र आहेत. तसेच सर्व उद्दिष्ट गाठण्याकरिता मोलाचे मार्गदर्शन करण्यासाठी मी आपल्या सर्वांच्या वतीने मा. श्री. दिनेश वाघमारे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांचे आभार व्यक्त करतो.

आर्थिक वर्ष सन २०२०-२१ मध्येही विविध आव्हाने होती व आपल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्यावर मात करण्यासाठी आणि निर्धारित लक्ष्य साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. उदा. सन २०१६ पासून रखडलेले १३२ के. व्ही. धडगाव उपकेंद्र व सातपुडा डोंगर रांगामधून वाहिनी साहित्य/उपकरणे डोक्यावरून वाहून नेऊन उभारण्यात आलेली १३२ के.व्ही. तळोदा-धडगाव संलग्न वाहिनी व २२० के. व्ही. उरण-खारघर वाहिनीचे खाडीमधील पायाभरणीचे काम इत्यादी आव्हाने यशस्वीरित्या पार करण्यात आली.

सर्वांना ज्ञात आहे की, आपल्या कंपनी अंतर्गत अनेक जुने प्रकल्प सुरू आहेत. ज्यांच्या पूर्णत्वाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. उदा. ग्रीन एनर्जी कॉरिडॉर फेज-१ अंतर्गत सुरू असलेली कामे नवीन व नवीकरणीय मंत्रालय, मे. KfW यांच्या कालमर्यादेचे पालन करण्यासाठी व संपूर्ण निधीचा वापर होण्यासाठी सदर काम डिसेंबर-२०२२ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहेत.

वहिवाट रस्ता समस्या (RoW) सोडविण्यासाठी व वनविभागाच्या मंजुरीसाठी महसूल विभागात कामाचा दांडगा अनुभव असलेल्या समन्वय अधिकाऱ्याची (Nodel Officer) नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे वनविभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचे वेळखाऊ प्रस्ताव जलद मार्गी लावण्याच्या दिशेने फलदायी परिणाम दिसू लागले आहेत. मुंबई, पुणे व नाशिक परिमंडळ अंतर्गत येणाऱ्या पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी तेथील महत्त्वाची कामे तातडीने पूर्ण करणे सुध्दा अत्यंत गरजेचे आहे.

प्रकल्पांच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे/परिपत्रके जारी करण्यात आली आहेत. महत्त्वाचे १) आवश्यक असेल तेथे मनोऱ्याच्या वापरासाठी मनोऱ्याच्या प्रकाराचा उल्लेख करून महापारेषण/कंत्राटदार यांच्या भांडार विभागात मनोऱ्याचे साहित्य योग्यरित्या रचून ठेवणे २) नवीन आगामी उपकेंद्रात ऑक्झिलरी वीज पुरवठ्याची (Auxiliary Supply) वेळेवर तरतूद करणे ३) वहिवाट समस्या सोडविण्यासाठी शेतकरी/जमीनमालकांना नुकसानभरपाईची रक्कम वेळेवर अदा करण्यासाठी व त्याच्या सुलभ निराकरणासाठी सर्वसाधारण आदेश-१ (G.O.-I) वित्त व लेखा (Works) च्या कलम ४६ मध्ये सुधारणा करून पारेषण वाहिनी उभारताना नुकसानभरपाई देण्याच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ करणे इत्यादी.

काही प्रलंबित प्रकल्प प्रदीर्घ कालावधी उलटूनही अद्याप सुरू आहेत व विविध कारणांमुळे रखडलेले आहेत. यातून काळजीपूर्वक नियोजनाचे महत्त्व लक्षात येते. त्यासाठी आपण कटिबध्द असणे गरजेचे आहे.

तसेच या वर्षासाठीची २००० एम. व्ही. ए. स्थापित क्षमतावाढ, ८०० सर्किट कि.मी. अ. उ. दा. वाहिनी उभारणी व १००० एम. व्ही. ए. रिऍक्टिव्ह पॉवर क्षमता उभारणी ही उदि्दष्टे पूर्ण करण्यासाठी आपण सर्वजण कठोर मेहनत करून १०० टक्के योगदान द्याल, याबद्दल मला खात्री आहे. सरतेशेवटी सर्वांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, 'सुरक्षा ही आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे'. अपघात टाळण्यासाठी आणि मानवी जीवन वाचविण्यासाठी कंत्राटदार व महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योग्य सुरक्षा उपकरणांचा वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**– नसीर कादरी**
**संचालक (प्रकल्प), महापारेषण**

From the Desk of Director, HR

# प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांची भरारी



महापारेषण प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र पडघे या प्रशिक्षण केंद्राला केंद्रीय विद्युत प्राधिकरण विद्युत मंत्रालय, भारत सरकारव्दारे १ मे २०२१ ते ३० एप्रिल २०२५ या चार वर्षासाठी पारेषण क्षेत्रात वीज योजनाप्रणालीच्या/संचालन देखभालीचे प्रशिक्षण देण्यासाठी श्रेणी दोन (ग्रेड-बी) प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे, ही खूप अभिनंदनीय बाब आहे.

या प्रशिक्षण केंद्राने नफा केंद्र म्हणून स्वतःला विकसित करण्यासाठी २०१७-२०२२ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी विद्यालयातील एकूण ११,६०८ विद्यार्थ्यांना HVDC Sub-Station आणि कार्यप्रणाली या विषयावर विशेष प्रशिक्षण देऊन महापारेषण कंपनीने अंदाजे १२,४६,७९८ रूपये इतके उत्पन्न मिळविले.

२०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या संकट काळात गुगल मीट, झूम तसेच मायक्रोसॉफ्ट टीम्स या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षणाचे कार्यरत अभियंता व तंत्रज्ञासाठी आयोजन केले. २०१६-२०२१ या कालावधीत नो युवर सबस्टेशन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षण आपल्या दारी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. २०१६ ते २०२१ या कालावधीत मानव संसाधन, वित्त व लेखा स्थापत्य तसेच तांत्रिक कर्मचारी श्रेणी एक ते चार या सर्वांकरिता प्रशिक्षण घेतले. तसेच मानव संसाधन व वित्त व लेखामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता तांत्रिक प्रशिक्षण आयोजित करत प्रशिक्षणामध्ये विविध आणण्याचा प्रयत्न केला, हे खूप उल्लेखनीय आहे.

प्रेरणपातळी प्रशिक्षण, उजळणी, वर्गासोबतच तेजस्विनी, शक्ती, सर्वोत्तम, परिवर्तन या व्यक्तिमत्व विकसित करणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचेही आयोजन केले. प्रशिक्षणातील ही विविधता या केंद्राची गुणसंख्या वृध्दीकरिता उपयुक्त ठरली.

महिला वर्गासाठी विशेष असे ऊर्जा, Women health and Welfare Holistic way of Living यासारख्या विषयाचे महत्त्वपूर्ण प्रशिक्षण देण्यात आले. महापारेषण कंपनीतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्तीनंतरचे नियोजन या विषयावर महत्त्वपूर्ण असे प्रशिक्षण देण्यात आले. वाहिनी उपविभागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना Patrolling करताना उपयोगी ठरेल असे Drone Camera Operation याचेसुध्दा प्रशिक्षण देण्यात आले. मानव संसाधन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी खास शिस्तभंग कार्यवाही प्रशिक्षण देण्यात आले.

ऑनलाईन प्रशिक्षणात व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि प्रशिक्षणाचे लाईव्ह स्ट्रिमिंग करण्यात आले. याचा फायदा महापारेषण कंपनीतील इतर परिमंडळातील कर्मचाऱ्यांनाही झाला. प्रशिक्षणाचे स्टडी मटेरियल पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून तसेच ई-मेलव्दारे प्रशिक्षणार्थीना शेअर करण्यात आले.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे सीइए रिकग्निशन रिन्यूअलसाठी झालेल्या सीइए नवी दिल्लीच्या टीमच्या इन्स्पेक्शनमध्ये आरटीसी चंद्रपूरला ए ग्रेड मानांकन मिळाले आहे. हे नामांकन हे २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी प्राप्त झाले आहे. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे सर यांच्या कुशल नेतृत्वाखाली हे यश महापारेषणने मिळविले आहे.

२०१६-२०२१ या कालावधीत या प्रशिक्षण केंद्राने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम जसे KYS हे १२ आठवड्याचे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे प्रमाणपत्र प्रशिक्षण, अभियांत्रिकी विद्यार्थी आणि व्याख्यातांसाठी प्रशिक्षण, बाहेरील कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विविध कंपन्यातील ईएचव्ही ग्राहकांसाठी तसेच WCL कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यामुळे प्रशिक्षण केंद्राच्या ग्रेडमध्ये सुधारणा झाली.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या पाचशे पुस्तकांच्या ग्रंथालयाचे डिजिटायझेशन त्याचबरोबर ई-पुस्तके, व्हिडिओ व पुस्तकांचा १०० टक्के वापर केला आहे. प्रशिक्षणाचे स्टडी मटेरियल गुगल ड्राइव्ह, व्हॉटसअप तसेच ई-मेलव्दारे प्रशिक्षणार्थींना शेअर करण्यात आले. या आधुनिक माध्यमांचा प्रशिक्षणासाठी केलेला वापर या प्रशिक्षण केंद्राचा ग्रेड उंचावण्यासाठी उपयुक्त ठरला.

वाढलेली प्रात्यक्षिक व्यवस्था, प्रशिक्षण हॉलमधील सुविधा, प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि इतर सुविधा त्याचप्रमाणे मॉडेलची वाढलेली संख्या, उपकेंद्रात प्रात्यक्षिकांसाठी असलेली सुविधा, प्रशिक्षण केंद्रात देण्यात येणारी प्रात्यक्षिके, ग्रंथालयात वाढलेली पुस्तकांची संख्या आणि वापर, वाढलेले मॅनडेज व वसतिगृहाचा वापर आणि सुविधा तसेच आंतर आणि बाह्य क्रीडा सुविधा, वाढलेली प्रशिक्षकांची संख्या आणि गुणवत्ता, बजेटचा १०० टक्के वापर आणि प्रशिक्षणामधील विविधता व आधुनिक माध्यमांचा वापर यामुळे सर्वांचे लक्ष वेधले. त्यामुळे प्रशिक्षण केंद्राची ग्रेड उंचावण्यासाठी उपयुक्त ठरले.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, जेजुरी या प्रशिक्षण केंद्रालाही केंद्रीय विद्युत मंत्रालय भारत सरकारव्दारे जुलै २०२१ ते जून २०२५ या चार वर्षासाठी पारेषण क्षेत्रात वीजयोजना/प्रणालीच्या संचलन आणि देखभालीचे प्रशिक्षण देण्यासाठी श्रेणी दोन (ग्रेड-बी) प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यांचेही मी मनापासून अभिनंदन करतो.

२०१६-२०२१ या कालावधीत प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण कक्ष, उपाहारगृह तसेच वसतिगृह इमारत क्रमांक एकमध्ये स्थापत्य विभागाने सुधारणा कामे करत फ्लावर बेड, बगीचा तयार करत रंगरंगोटी करत प्रशिक्षण केंद्राचे बाह्यस्वरूप बदलले. अनेक गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिकावर भर देणाऱ्या प्रशिक्षणाचे याच कालावधीत नियोजनबध्द आयोजन केले. यामुळे प्रशिक्षण केंद्राचे अंतरंग बदलले.

या प्रशिक्षण केंद्राने प्रॉफिट सेंटर म्हणून स्वतःला विकसित करण्यासाठी विविध कंपन्यातील ईएचव्ही ग्राहकांसाठी तसेच कोजनरेशन, सोलर जनरेशन विंड जनरेशनमध्ये काम करणाऱ्या अभियंता, कर्मचाऱ्यांसाठी 'अंडरस्टॅंडिंग ईएचव्ही ग्रिड आणि प्रोटेक्शन कॉर्डिनेशन' या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन केले. २०१६-२०१७ मध्ये पाच बॅचमध्ये झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात विविध कंपनीतील ८५ अभियंत्यांनी प्रशिक्षण घेतले. पुणे परिमंडळात वाहिनी देखभाल उपविभागात काम करणाऱ्या ५३ तंत्रज्ञांसाठी २०१८ मध्ये प्रशिक्षण केंद्रातील १३२ के. व्ही. डमी टॉवरवर चार तुकड्यांमध्ये चार दिवसाचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षणाचे आयोजन केले.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या चारशे पुस्तकांच्या ग्रंथालयाचे डिजिटायझेशन, पुस्तकांच्या सोबतच व्हिडिओ लायब्ररीने इन्स्पेक्शनकरिता आलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. विविध ट्रेनिंग टीचिंग टुल्स (Kahoot, Prezi, Mentimeter, Mindmap) चा वापर करत ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. ट्रेनिंगब्रिज युट्युब चॅनल, आरटीसी जेजुरी फेसबुक पेज या आधुनिक माध्यमांचा वापर या प्रशिक्षण केंद्राचा ग्रेड उंचावण्यासाठी उपयुक्त ठरला.

पुनशः एकदा मी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघे, चंद्रपूर व जेजुरी यांचे व त्यांच्या टीमचे मनापासून अभिनंदन करतो. भविष्यातही आपण चांगली कामगिरी कराल, याची मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**
**संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.